।।श्री।।

# मकर संक्रांती

संक्रांत म्हणजे बदल. त्या दिवशी सूर्याचे धनू राशीतून मकर राशीत संक्रमण होते. या संक्रमणाचा हा पहिला दिवस. तसे प्रत्येक राशीचे संक्रमण होत असते पण या वेळी सूर्याची मकरवृत्ता पासून कर्कवृत्ता कडे जायला सुरवात होते त्यामुळेच थंडी कमी कमी व्हायला सुरवात होते.
या दिवसा अगोदर रात्र मोठी आणि दिवस लहान असतो. या दिवशी रात्र आणि दिवस दोन्हीही समान असतात. या दिवसानंतर रात्र लहान आणि दिवस मोठा मोठा होत जातो.
पौष महीन्यात येणारा, शेती संबंधित तसेच सौर काल गणनेशी संबंधित असा हा महत्वाचा भारतीय सण आहे. तसाच भारताबाहेरही नेपाल, थायलंड, लाओस, म्यानमार या भागातही साजरा होतो.

शेतात आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकींना देतात. हरबरे ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अश्या गोष्टी सुगड्यात (लहानमातीचे मडके) भरून त्या देवाला अर्पण करतात.

एकमेकांना “तिळगूळ घ्या गोड बोला” यांची देवाण घेवाण पण होते. असा हा सांस्कृतिक तसाच सामाजिक सण आहे. त्यानिमित्तिने स्त्रिया हळदकुंकूचे कार्यक्रम करून भेटवस्तूचे वाण एकमेकींना देतात. हा हळदकुंकू समारंभ संक्रांत ते रथसप्तमी पर्यंत करतात. संक्रांत ही देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते अशी समजूत आहे.

 संक्रांत च्या आदल्या दिवशी महाराष्ट्रात भोगी या नावाने साजरा होतो. या वेळी सर्व शेंगभाज्या, फळभाज्या यांचा तीळाचा कूट खालून केलेली मिश्र भाजी, तसेच तीळ लावलेली बाजरीच्या पीठाची भाकरी, मुगाची खिचडी हे आवर्जून केले जाते.

गुळाची पोळी व तिळगुळाचे विशेष महत्व आहे. संक्रांतीचा काळ हा थंडीचा असतो तर अंगात उष्णता निर्माण होण्यासाठी तीळ खातात, तीळ म्हणजे सिग्धता, सिग्धता म्हणजेच मैत्री, मैत्रभाव. स्नेहाने गोडी वाढवा ह्याच हेतूने या दिवशी तिळगूळाची देवाण घेवाण होते. स्नेहाने बंधन दृढ होते.

 गुजराथमध्ये संक्रांतीच्या दिवशी खुल्या वातावरणात पतंग उडवतात. सामाजिक स्नेहबंधन करमणुकी व्दारे साधले जाते. खुल्या वातावरणात सूर्याचे ऊन अंगावर घेत पतंग उडवण्याचा कार्यक्रम आनंद देतो आणि थंडी पण पळवतो.

असा हा सांस्कृतिक, सामाजिक, सौर कालगणनेशीसंबंधीत, शेतीशी संबंधीत, करमणुकी व्दारे सगळ्यांना एकत्र आणणारा, तीळ गुळाने स्नेह वाढवणारा, काळ्या रंगाचे वस्त्र परिधान याच सणाला करता येणारा, आध्यामिक महत्त्व असलेला असंख्य भारतीय सणांपैकी एक महत्त्वाचा सण, मकर संक्रांतीचा सण.



संक्रांतीला सूर्य चालला
नव्या क्षितिजा कडे
अंधाराची तमा मोडूनी
प्रकाश उजळे पुढे
मनात आपल्या प्रभा फाकूनी
अज्ञानाची पुटे फेकूनी देऊ
संक्रांतीला हिच प्रतिज्ञा असे।।

उत्तरा भालेराव , टॅम्पा फ्लोरीडा